**ठळक बातम्या**

- २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारतात प्रत्यार्पण
- एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती
- भगवान महावीर जयंतीनिमित्त राज्यभरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- IPL मध्ये आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना

**<><><><><>**

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारताकडे प्रत्यार्पण झाल्याचं राष्ट्रीय तपास संस्थेनं सांगितलं. २००९ पासून तो अमेरिकेत अटकेत होता. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक राणाला घेऊन आज नवी दिल्लीत पोहोचलं. या कारवाईला स्थगिती मिळावी यासाठी राणाने सर्व कायदेशीर मार्गांचा अवलंब केला होता. अमेरिकी न्याय व्यवस्थेनं प्रत्यापण रोखायला नकार दिल्यानंतर आज शेवटी त्याचं प्रत्यार्पण पूर्ण झालं.
याप्रकरणी सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी केंद्र सरकारनं नरेंदर मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे.

**<><><><><>**

तहव्वुर राणाच्या प्रत्यापर्णाविषयी देशभरातून व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया आता आपण ऐकूया...

**होल्ड...**

*राणा याचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री अमित शहा आणि पीयूष गोयल यांनी दिली आहे. देशाकडे वाईट नजरेने पाहणाऱ्याला कठोर शिक्षा देण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निर्धार होता, ज्याने भारताच्या भूमीवर हल्ला केला त्याला इथल्या कायद्यानुसार आपण शिक्षा करू शकतो असं गोयल म्हणाले.*

*तहव्वूर राणाला भारतात आणणं ही आनंदाची गोष्ट असून त्याला फाशीची शिक्षा दिली जावी, अशी अपेक्षा अशोक चक्र विजेते पोलीस कर्मचारी शहीद तुकाराम ओंबळे यांचे भाऊ एकनाथ ओंबळे यांनी व्यक्त केली. कायदेशीर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असंही ते म्हणाले.*

*तहव्वूर राणाचं प्रत्यार्पण हा भारतासाठी मोठा विजय असल्याचं शिवसेना नेत्या शायना एन सी म्हणाल्या. राणाला फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी त्यांनी केली.*

**<><><><><>**

तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणामुळे २६/११ मुंबई हल्ल्याचा पाकिस्तानशी असणारा संबंध उलडायला मदत होणार आहे. या हल्ल्याशी आपला संबंध नसल्याचं पाकिस्ताननं म्हटलं आहे. मात्र राणावरील खटल्यामुळे या कटाचा उलगडा होणार आहे. याप्रकरणाचा इतिहास थोडक्यात जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड**

*तहव्वूर राणा याला २६/११ मुंबई हल्ल्याप्रकरणी २००९ मधे अमेरिकेत अटक झाली होती. या हल्ल्यासाठी त्याने मदत पुरवल्याचं अमेरिकन न्यायालयात सिद्ध झालं आहे. या हल्ल्याचा मास्टरमाईंड डेव्हिड हेडली याला मदत केल्याचा त्याच्यावर ठपका आहे. राणाला २०१३ मधे १४ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. राणा आणि डेव्हिड हेडली यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात खटला चालवला गेला. तसंच त्याच्या प्रत्यार्पणाची मागणी भारताकडून केली जात होती. २०२३ मधे अमेरिकेने या प्रत्यार्पणाला मान्यता*

*दिली  होती. ही प्रक्रिया पूर्ण होऊन आज तहव्वूर राणा याचं प्रत्यार्पण भारताकडे झालं आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईतसह मी राजेश शिरभाते*

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या प्रत्यार्पण कराराची माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड**

*१९६२ च्या प्रत्यार्पण कायद्यानुसार भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ ला प्रत्यार्पणाचा करार झाला होता. तत्कालीन प्रधानमंत्री इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमधले परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री सलीम शेरवानी आणि अमेरिकेचे परराष्ट्र उपमंत्री स्ट्रोब टॅलबॉट यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. गुन्हेगाराला एक वर्षाची किंवा अधिकची शिक्षा झालेली असेल तर प्रत्यार्पणाचा कायदा लागू होतो. मात्र राजकीय गुन्ह्यांसाठी हा कायदा लागू होत नाही. या कायद्यान्वये एका देशाला हवा असलेला गुन्हेगार दुसऱ्या देशात असेल तर त्याला तिथेही फरार किंवा गुन्हेगार मानलं जातं. तसंच ज्या देशात त्याने गुन्हा केला आहे त्या देशात आणून इथल्या कायद्यानुसार खटला चालवला जाऊ शकतो. याआधी या कायद्यानुसार पंजाबचे मुख्यमंत्री प्रताप सिंग कैरो यांच्या हत्येतील आरोपी सुच्चा बस्सी आणि १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी अबु सालेम यांचं प्रत्यार्पण भारताकडे झालं होतं.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईतसह मी अंकिता आपटे*

**<><><><><>**

नाशिक मधल्या एका व्यावसायिकाचे अपहरण आणि खंडणी प्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली. अपहरण करणाऱ्या दोघांकडून  २ लाख ८८ हजार रुपये रोख

आणि मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ८ हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे.

<><><><>

गोंदिया इथून  सुटणाऱ्या बरौनी एक्स्प्रेसमध्ये चांदीच्या दागिन्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन प्रवाशांना रेल्वे पोलीसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून १० किलो ३६८ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त केले. या दागिन्यासंदर्भात चौकशी केली असता कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली  नसल्यानं ही  कारवाई केली.

<><><><>

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष आहेत. एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवाशांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचं सरनाईक यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

महावीर जयंतीनिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**मुंबईत** महावीर जयंती निमित्त भारत जैन महामंडळ या संस्थेतर्फे 'महावीर स्वामी जन्म कल्याणक' या महोत्सव आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते भारत जैन महामंडळ संस्थेच्या १२५ व्या वर्धापन दिनानिमित्त काढलेला 'जैन जगत' विशेषांक प्रकाशित करण्यात आला.  केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी अहिंसेचा पुरस्कार करताना दुष्ट प्रवृत्तींना शासन करणे देखील महत्वाचे असते असे यावेळी सांगितले.

यावेळी आचार्य नयपद्मसागर यांनी मुंबईतील १५०० सार्वजनिक शाळांना नवसंजीवनी देऊन तेथील लाखो गरीब मुलांना मोफत भोजन, शिक्षण, कौशल्य शिक्षण व संस्कार देण्याचा संकल्प सोडला.

**पुण्यात** आज सकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली. श्री जैन सामुदायिक उत्सव समितीनं मिरवणुकीचं आयोजन केलं होतं.

**नाशिक**मध्ये महावीर जयंती निमित्तं नाशिकरोड, सिडको या परिसरात मिरवणुका काढण्यात आल्या.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या वणी इथल्या सप्तशृंग गडावर आज चैत्रोत्सवानिमित्त जवळपास दोन लाखांहून अधिक भाविकांनी हजेरी लावली. त्यामुळे प्रशासनाचं नियोजन कोलमडलं आणि गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. त्यानंतर गर्दीचं नियोजन करण्यात आलं असून चेंगराचेंगरी झाली नसल्याची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिली आहे.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र जोतिबा गडावर चैत्र यात्रेसाठी भाविक दाखल होत आहेत. शनिवारी या यात्रेचा मुख्य दिवस असून कालपासूनच हजारो भाविक उंचच उंच सासनकाठ्या घेऊन जोतिबाचा गड चढत आहेत. भाविकांसाठी रत्नागिरी डोंगर गायमुख परिसरात १३ एप्रिलपर्यंत मोफत अन्नछत्र चालवण्यात येणार असल्याची माहिती विश्वस्तांनी दिली आहे.

**<><><><><>**

वेव्हज २०२५ अंतर्गत येणाऱ्या Innovate2Educate: Handheld Device Design challenge स्पर्धेच्या १० विजेत्यांची घोषणा इंडियन डिजिटल गेमिंग सोसायटीने केली आहे. यात कर्नाटक पर्व, विद्यार्थी, टेक टायटन्स, प्रोटोमाइंड्स, एपेक्स अचिव्हर्स, सायन्सव्हर्स, व्ही२०, वॉरियर्स, किडीमैत्री, ई-ग्रूट्स या

विजेत्यांचा समावेश आहे. मुलांसाठी स्मार्ट लर्निंग टॅबची निर्मिती, स्मार्ट लिखाणासाठीचं उपकरण तयार करणं, कोड्यांच्या माध्यमातून गणितं सोडवणं अशा प्रकारच्या विविध उपकरणांच्या निर्मितीसाठी या दहा विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. हे विजेते येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हजच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात बेंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडिअमवर सामना होणार आहे. सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता सुरुवात होईल. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धा आता रंगतदार होते आहे. गुणतालिकेत गुजरात टायटन्सचा संघ पाचपैकी चार सामने जिंकून ८ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. तर त्याखालोखाल तीनपैकी तीन सामने जिंकून ६ गुण पटकावलेला दिल्ली कॅपिटल्सचा संघ दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासांत राज्यात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरड होतं.

येत्या काही दिवसांत कोकण, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. तर तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहिल. विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यात उर्वरित ठिकाणी हवामान कोरडं राहिल.

**//<><><><><>//**